मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# चाकण औद्योगिक पट्ट्यात वाहतूक कोंडीवर ‘ॲक्शन प्लॅन’

## रस्त्यावरील पार्किंगला ‘झिरो टॉलरन्स’; १०० MSF जवान तैनात

» पिंपरी | प्रतिनिधी

**चाकण औद्योगिक परिसरातील वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था, पार्किंग, अतिक्रमण, वीजपुरवठा तसेच अन्य पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर विविध शासकीय यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय साधून कालबद्ध पद्धतीने उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीत विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना स्पष्ट कालमर्यादा व जबाबदाऱ्या निश्चित करून देण्यात आल्या.**



या बैठकीला आमदार बाबाजी काळे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पीएमआरडीए, एम.आय.डी.सी, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, एमएसआरडीसी, एमएसआयडीसी, जिल्हा परिषद या सर्व यंत्रणाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार चाकण औद्योगिक परिसरातील विविध प्रश्नांच्या समन्वयासाठी जिल्हाधिकारी व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत एमआयडीसी, एमएसआयडीसी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पीएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपरिषद, जिल्हा परिषद, महसूल व पोलीस विभागांसह विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. विविध यंत्रणा स्वतंत्रपणे काम करत असताना निर्माण होणारा समन्वयाचा अभाव दूर करून एकत्रितपणे उपाययोजना करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

चाकण औद्योगिक परिसरातील रस्त्यांवरील अनधिकृत टपऱ्या, चहाच्या स्टॉल्स, गोदामे व अन्य अतिक्रमणांची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधितांना नियमानुसार नोटीस देऊन २५ ऑगस्टपासून पुढील एक महिन्यात अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. अतिक्रमण हटविल्यानंतर संबंधित जागेवर तातडीने रस्ता अथवा आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. कोणत्याही व्यक्तीचे अतिक्रमण राजकीय अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे कारवाईतून वगळले जाणार नाही. याबाबतही ‘झिरो टॉलरन्स’ धोरण राहणार असल्याचे जिल्हाधिकारी डुडी यांनी स्पष्ट केले.

चाकण परिसरातील सुमारे ५०० किलोमीटर रस्त्यांचे सर्वंकष नियोजन करण्यात येत असून, भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता व आधुनिक वाहतूक सिम्युलेशनच्या माध्यमातून वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यात येणार आहे. संपूर्ण परिसर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आणून त्याचे व्यवस्थापन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या माध्यमातून करण्याचे नियोजन आहे. यामुळे वाहतूक कोंडी, अपघात, बंद पडलेली वाहने आदी बाबींची माहिती तातडीने उपलब्ध होऊन त्यावर तत्काळ कार्यवाही करता येणार आहे.

चाकण औद्योगिक परिसरातील रस्त्यांच्या विकासामध्ये पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी स्टॉर्म वॉटर ड्रेनेजसोबतच पादचाऱ्यांसाठी पदपथ, योग्य ठिकाणी पादचारी क्रॉसिंग आदी सुविधा विकसित करण्याचे नियोजन आहे. मागील काही काळात रस्त्यांवरील अपघातांमध्ये जीवितहानी झाल्याने पादचारी सुरक्षेला विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे. राष्ट्रीय महामार्गावरील अनधिकृत डिव्हायडर कट बंद करून वाहतूक सुरळीत करण्याचे निर्देशही संबंधित यंत्रणेला देण्यात आले. अनधिकृत ठिकाणी वाहनांना यू-टर्न घेण्यामुळे वाहतुकीचा वेग कमी होऊन अपघाताचा धोका वाढत असल्याने नियमानुसार आवश्यक त्या ठिकाणीच प्रवेश व वळणाची व्यवस्था ठेवण्यात येणार आहे.

औद्योगिक परिसरातील वीजपुरवठ्यातील वारंवार होणारे ट्रिपिंग व लोडशेडिंगच्या प्रश्नावरही बैठकीत चर्चा झाली. आवश्यक ट्रान्सफॉर्मर व अन्य विद्युत यंत्रणा उभारण्यासाठी एमआयडीसी परिसरातील आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यास शासनाची मंजुरी मिळाली असून, संबंधित कामे ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. दीर्घकालीन उपाययोजनांच्या माध्यमातून ३१ डिसेंबरनंतर औद्योगिक परिसरातील ट्रिपिंग व लोडशेडिंगची समस्या दूर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

राष्ट्रीय महामार्ग, एमएसआयडीसी, रेल्वे आदी विविध यंत्रणांची आगामी कामे सुरू होणार आहेत. ही कामे सुरू करताना वाहतुकीवर अतिरिक्त ताण निर्माण होऊ नये यासाठी पर्यायी मार्ग, वाहतूक वळविण्याची व्यवस्था आणि वाहतूक सिम्युलेशनचा अभ्यास करूनच संबंधित विभागांना काम सुरू करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

नाशिक फाटा ते पुढील भागासाठी प्रस्तावित सुमारे २८ किलोमीटर लांबीच्या उन्नत मार्गाच्या कामासाठी निविदा प्रक्रिया सुरू झाल्याची माहितीही बैठकीत देण्यात आली. या प्रकल्पामुळे भविष्यात चाकण परिसरातील वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे म्हणाले की, मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार झालेल्या बैठकीत चाकण औद्योगिक परिसरातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली.

अल्प, मध्यम व दीर्घकालीन उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले असून सर्व संबंधित यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. रस्त्यांवरील खड्डे व साइडपट्ट्यांची दुरुस्ती, उपलब्ध मोकळ्या जागांमध्ये पार्किंगची व्यवस्था, अतिक्रमण हटविण्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त, डिव्हायडर कट बंद करणे आदी उपाययोजनांमुळे वाहतुकीचा वेग वाढण्यास मदत होईल. संबंधित यंत्रणांनी मागणी केल्यानंतर आवश्यक पोलीस मनुष्यबळ तत्काळ उपलब्ध करून देण्यात येईल.

वाहतूक व्यवस्थापन व वाहतूक सिम्युलेशन करण्याबाबतही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असल्याचे त्यांनी सांगितले. चाकण परिसरातील प्रश्नांच्या निराकरणासाठी ठरविण्यात आलेल्या कालमर्यादेनुसार पुढील काही दिवसांत प्रत्यक्ष परिणाम दिसून येतील, असा विश्वास जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी व्यक्त केला. तसेच माध्यमांनीही या उपाययोजनांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवून वस्तुनिष्ठ अभिप्राय द्यावा, जेणेकरून आवश्यक त्या सुधारणा तत्काळ करता येतील, असे आवाहन त्यांनी केले.

### वाहतूक व्यवस्थेसाठी १०० एमएसएफ जवान..

चाकण औद्योगिक परिसराचा मोठा भौगोलिक विस्तार लक्षात घेता पोलीस मनुष्यबळावरील ताण कमी करण्यासाठी १०० महाराष्ट्र सुरक्षा दलाचे (MSF) जवान पोलीस विभागाला उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. हे जवान दोन पाळ्यांमध्ये वाहतूक व्यवस्थापनासाठी कार्यरत राहतील. रस्त्यावर वाहन बंद पडल्यामुळे वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी मोठ्या क्षमतेच्या क्रेनची व्यवस्था करण्यात येणार असून, बंद पडलेली वाहने तातडीने रस्त्याच्या बाजूला अथवा निर्धारित ठिकाणी हलविण्यात येतील.

### ३१ ऑगस्टपर्यंत रस्ते खड्डेमुक्त करण्याचे निर्देश

चाकण औद्योगिक परिसरातील सर्व प्रमुख रस्त्यांवरील खड्डे तसेच साइडपट्ट्यांची दुरुस्ती ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. कामात विलंब झाल्यास संबंधित सक्षम प्राधिकारी, अभियंता व कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. चाकण परिसरातील वाहतूक कोंडीचे प्रमुख कारण असलेल्या रस्त्यावरील अवजड वाहनांच्या पार्किंगवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. एमआयडीसी परिसरातील उपलब्ध मोकळ्या जागांचा पार्किंगसाठी वापर करण्यात येणार असून, तळेगावपासून भंडारा डोंगर परिसरापर्यंत उपलब्ध जागांचा नियोजनबद्ध वापर केला जाणार आहे.

शुक्रवारपासून रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे वाहन पार्क करण्यास पूर्णतः प्रतिबंध राहणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर जप्तीसह कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी ‘झिरो टॉलरन्स’ धोरण अवलंबण्यात येणार आहे.

# मोशीत साकारणार वंचित आदिवासी समाजासाठी सर्वांगीण विकास केंद्र!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश; राज्य मंत्रिमंडळाची जमीन देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवडमधील मौजे मोशी (ता. हवेली) येथील १५ हेक्टर शासकीय जमीन क्रांतिवीर चापेकर समिती, क्रांतितीर्थ चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय (चिंचवड गाव) आणि पुनरुत्थान समरसता गुरुकुलम अनुदानित आदिवासी आश्रम शाळेला देण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, या जागेवर मागास व वंचित आदिवासी समाजासाठी शिक्षण, संस्कार आणि सामाजिक विकासाचे सर्वांगीण केंद्र साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**




क्रांतिवीर चापेकर समितीचे पद्मश्री गिरीश काका प्रभुणे यांनी या जागेची मागणी केली होती. त्यांच्या मागणीला राज्य सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला. विधानसभा अधिवेशनादरम्यान आमदार महेश लांडगे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या जागेचा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली होती. या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सकारात्मक बळ दिले. त्यानंतर शासनस्तरावर प्रक्रिया गतिमान झाली आणि अखेर मंत्रिमंडळाच्या बैठकीत १५ हेक्टर शासकीय जमीन देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली.

आमदार महेश लांडगे यांनी 'क्रांतिवीर चापेकर समिती जागा मागणी' हा विषय सातत्याने शासनदरबारी लावून धरला होता. नुकतेच त्यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र पाठवून पिंपरी-चिंचवड शहरातील प्रलंबित विषयांबाबत आढावा बैठक घेण्याची विनंती केली होती. यामध्ये या जागेच्या मागणीचाही समावेश होता. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आता या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती मिळणार आहे.

मंजूर करण्यात आलेल्या या जागेवर क्रांतिवीर चापेकर समिती, क्रांतितीर्थ चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय आणि पुनरुत्थान समरसता गुरुकुलम अनुदानित आदिवासी आश्रम शाळेच्या माध्यमातून मागास व वंचित आदिवासी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विकास केंद्र साकारले जाणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण, संस्कार, कौशल्यविकास आणि सामाजिक प्रगतीच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

या निर्णयाबद्दल आमदार महेश लांडगे यांनी राज्य शासन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत. सामाजिक समरसता, शिक्षण आणि वंचित घटकांच्या विकासाला चालना देणारे हे केंद्र पिंपरी-चिंचवड परिसरासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

> "पद्मश्री गिरीश काका प्रभुणे यांनी केलेली मागणी आणि त्यामागील व्यापक सामाजिक उद्देश लक्षात घेऊन हा विषय शासनदरबारी सातत्याने मांडला. विधानसभा अधिवेशनादरम्यान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन जागेचा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या मागणीला सकारात्मक बळ दिले. अखेर मंत्रिमंडळाने १५ हेक्टर शासकीय जमीन देण्यास मंजुरी दिल्याने हा प्रश्न मार्गी लागला, याचा मनस्वी आनंद आहे. या केंद्रामुळे वंचित आदिवासी समाजातील मुलांना शिक्षण, संस्कार आणि विकासाच्या नव्या संधी मिळतील. पिंपरी-चिंचवड शहर व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी माझा पाठपुरावा यापुढेही असाच सुरू राहील."
>
> **-महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# पिंपरीतील स्वीकृत नगरसेवकांची गुरुवारी नियुक्ती?

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**महापालिकेतील दहा स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीचा जून महिन्यात दफ्तरी दाखल करण्यात आला होता. मात्र, हा प्रस्ताव गुरुवारी (ता. १८) होणाऱ्या सर्वसाधारण सभेसमोर पुन्हा मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. सत्ताधारी भाजपकडील सात नावे अद्याप अंतिम न झाल्याने या सभेत नियुक्त्या जाहीर होणार की प्रस्ताव पुन्हा तहकूब होणार याकडे राष्ट्रवादी काँग्रेस तसेच भाजपमधील इच्छुकांचे लक्ष लागले आहे.**

> "स्वीकृत नगरसेवक नियुक्तीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर आला आहे. नावे निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. कोअर कमिटीकडून नावे प्रदेश नेतृत्वाकडे पाठविली जातील. अर्जांची छाननीही करावी लागणार आहे."
>
> **शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजप**

महापालिका निवडणुकीत भाजपचे ८४, राष्ट्रवादी काँग्रेसचे ३७, शिवसेना सहा आणि एक अपक्ष असे १२८ सदस्य निवडून आले आहेत. संख्याबळानुसार दहा स्वीकृत नगरसेवकांपैकी भाजपला सात, तर राष्ट्रवादी काँग्रेसला तीन जागा मिळणार आहेत. प्रशासनाने मार्च महिन्यात स्वीकृत नगरसेवक नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली होती. त्यावेळी प्रशासनाने दिलेल्या मुदतीत राष्ट्रवादी काँग्रेसने तीन उमेदवारांचे अर्ज दाखल केले. मात्र, भाजपकडून नावे निश्चित न झाल्याने मुदतवाढ मागण्यात आली. त्यानंतर जून महिन्यात प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्यात आला आणि अर्धवट प्रस्तावात दुरुस्ती करून सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले. मात्र जूननंतरही प्रशासनाने नव्याने अर्ज मागविणे किंवा भाजपच्या उमेदवारांची कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. अद्याप भाजपच्या एकाही इच्छुकाने अधिकृत अर्ज दाखल केलेला नसल्याची माहिती आहे. दरम्यान, महापौर रवी लांडगे यांनी १२ ऑगस्ट रोजी दिलेल्या पत्रानुसार दहा स्वीकृत नगरसेवक नियुक्तीचा प्रस्ताव गुरुवारच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर पुन्हा समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे सभागृहात भाजप सात नावे जाहीर करणार की पुन्हा प्रस्ताव तहकूब करण्याचा निर्णय घेणार, यावर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. मार्चमध्ये प्रक्रिया सुरू होऊनही राजकीय एकमताच्या अभावामुळे स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती रखडली. परिणामी दहा स्वीकृत नगरसेवकांचा तब्बल सहा महिन्यांचा कार्यकाळ वाया गेला असून, महापालिकेतील महत्त्वाच्या समित्यांमधील प्रतिनिधित्वही अपूर्ण राहिले आहे.





# रोषणाई काढताना कर्मचाऱ्याचा मृत्यू; ठेकेदाराच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालयांवर स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्युत रोषणाई करण्यात आली होती. ही रोषणाई काढत असताना पाय घसरून पडल्याने एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. राहुल साबळे (वय ४३) असे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. ही घटना मंगळवारी (दि. १८) कासारवाडी येथील महापालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयात घडली.**

महापालिकेच्या विद्युत विभागाने स्वातंत्र्य दिनानिमित्त महापालिका भवनसह दहा क्षेत्रीय कार्यालयांवर आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. हे काम मे. पार्वती इलेक्ट्रीक या ठेकेदाराला दिले होते. स्वातंत्र्य दिन झाल्यानंतर मंगळवारी ह क्षेत्रीय कार्यालयावरील विद्युत रोषणाई काढण्यासाठी चार कर्मचारी आले होते. हे कर्मचारी कोणत्याही सुरक्षेच्या साधनांशिवाय इमारतीवर चढले. त्यांना संबंधित ठेकेदाराने सुरक्षेची साधने देणे तसेच त्याचा वापर करणे बंधनकारक करणे आवश्यक होते. तसेच काम करणार असल्याचे संबंधित ठेकेदाराने महापालिकेच्या विद्युत विभागाला कळवले नसल्याचा दावा विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. दरम्यान, यामध्ये ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे गंभीर घटना घडली आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदारावर काय कारवाई करणार हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.ह क्षेत्रीय कार्यालयावरील विद्युत रोषणाई काढताना कर्मचारी इमारतीवरून खाली पडला. त्याला तातडीने वायसीएम रुग्णालयात हलवले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याचा मृत्यू झाला असल्याचे घोषित केले.

# पुण्याची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी 60 हजार कोटींचे रस्ते

## खेड-नाशिक फाटा एलिव्हेटेड मार्गासह तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गाला गती

**»» पुणे | प्रतिनिधी**

**पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाचा प्रश्न सोडवण्यासाठी केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर रस्ते विकासकामे हाती घेण्यात येणार आहेत. येत्या दोन वर्षांत तब्बल ६० हजार कोटी रुपयांच्या विविध रस्ते प्रकल्पांची कामे केली जातील, अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी केली. सिम्बायोसिस अभिमत विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'फेस्टिव्हल ऑफ थिंकर्स' कार्यक्रमात ते बोलत होते.**



या प्रकल्पांसाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकार्यातून विशेष 'इनोव्हेटिव्ह फायनान्सिंग मॉडेल' तयार करण्यात आले आहे. या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधीची उपलब्धता सुनिश्चित करण्यासोबतच रस्ते प्रकल्पांचा खर्च नियंत्रित ठेवण्यास मदत होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उपलब्ध संसाधनांचा प्रभावी उपयोग आणि विविध शासकीय यंत्रणांमधील समन्वय यामुळे या प्रकल्पांना अपेक्षित गती मिळेल, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.

पुणे शहरातून दररोज मोठ्या प्रमाणावर जड वाहने आणि लांब पल्ल्याची वाहतूक सुरू असते. त्यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर सातत्याने वाहतूक कोंडी निर्माण होत असून, त्याचा परिणाम प्रदूषण आणि प्रवासाच्या वेळेवरही होत आहे. ही समस्या कमी करण्यासाठी शहराबाहेरील विविध कॉरिडॉर, बाह्यवळण मार्ग आणि लिंक रोड विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे.

सूरत-नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर मार्गे जाणाऱ्या नव्या कॉरिडॉरमुळे उत्तर भारत आणि गुजरातकडून दक्षिण भारताकडे जाणारी लांब पल्ल्याची वाहने पुणे शहरात प्रवेश न करता थेट पुढील मार्गावर वळवता येणार आहेत. त्यामुळे पुण्यातील जड वाहनांची संख्या कमी होऊन शहरातील वाहतूक व्यवस्थेवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे. या नव्या मार्गामुळे दिल्ली ते चेन्नई प्रवासाचे अंतर सुमारे ३२० किलोमीटरने कमी होणार असल्याचे सांगण्यात आले.

याशिवाय ठाणे आणि शिळफाटा परिसरातून येणारी जड वाहतूक पुणे शहराच्या दिशेने न वळवता थेट अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने वळवण्यासाठी नवीन लिंक रोडचे नियोजन करण्यात आले आहे. या मार्गांमुळे मुंबई, पुणे तसेच आसपासच्या औद्योगिक परिसरातील वाहतुकीचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

मुंबई-पुणे-बंगळुरू या महत्त्वाच्या औद्योगिक आणि आर्थिक मार्गावरील वाहतूक अधिक गतिमान करण्यासाठी नवीन द्रुतगती मार्गाच्या कामालाही गती देण्यात येत आहे. या मार्गाच्या पागोटे चौकापर्यंतच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, पुढील टप्प्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नवीन द्रुतगती मार्गामुळे मुंबई, पुणे आणि बंगळुरू दरम्यानचा प्रवास अधिक वेगवान आणि सुरक्षित होण्यास मदत होणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई ते बंगळुरू प्रवास सुमारे पाच तासांत करणे शक्य होईल, अशी माहिती गडकरी यांनी दिली. या मार्गाचा फायदा प्रवासी वाहतुकीसोबतच औद्योगिक आणि मालवाहतूक क्षेत्रालाही मोठ्या प्रमाणावर होणार आहे.

या सर्व महत्त्वाकांक्षी रस्ते प्रकल्पांची एकत्रित अंमलबजावणी झाल्यास पुणे शहर आणि परिसरातील वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल होण्याची शक्यता आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासोबतच बाहेरील भागातील वाहतूक अधिक वेगाने पुढे जाण्यास मदत होईल.

### पुण्यासाठी प्रस्तावित प्रमुख रस्ते प्रकल्प

-शिरूर ते छत्रपती संभाजीनगर – १५ हजार कोटी रुपये, १९२ किमी
-खेड ते नाशिक फाटा एलिव्हेटेड मार्ग – ८ हजार कोटी रुपये, ३० किमी
-पुणे-शिरूर उन्नत मार्ग – ७,५१५ कोटी रुपये, ५३.४० किमी
-रावेत ते नऱ्हे उन्नत कॉरिडॉर – ६ हजार कोटी रुपये, ३२ किमी
-हडपसर ते यवत उन्नत मार्ग – ५,२६५ कोटी रुपये, ३१.६५ किमी
-तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्ग – ४ हजार कोटी रुपये, ५४.२० किमी

# खड्डा ठरला जीवघेणा! बालेवाडी-म्हाळुंगमध्ये ११ वर्षीय मुलाचा मृत्यू

**»» पुणे | प्रतिनिधी**

**बालेवाडी-म्हाळुंग परिसरात खराब रस्त्यावरील खड्ड्यामुळे झालेल्या अपघातात ११ वर्षीय ऋषभ पटोळे याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरातील रस्त्यांची दुरवस्था आणि खड्ड्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.**



प्राथमिक माहितीनुसार, ऋषभ दुचाकीवरून जात असताना रस्त्यावरील मोठ्या खड्ड्यामुळे त्याचा दुचाकीवरील ताबा सुटला आणि दुचाकी घसरली. त्यानंतर तो रस्त्यावर खाली पडला आणि त्याचवेळी मागून वेगाने येणाऱ्या आयशर टेम्पोखाली सापडला. या भीषण आणि दुर्दैवी अपघातात ऋषभचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर आयशर टेम्पोचालक घटनास्थळावरून फरार झाला असून, त्याचा शोध घेण्यासाठी बावधन पोलीसांकडून तपास सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच बावधन पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अपघाताची प्राथमिक माहिती घेत परिसराची पाहणी केली असून, या दुर्घटनेमागील नेमके कारण काय आहे, याचा तपास सुरू आहे. तसेच फरार झालेल्या टेम्पोचालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध पातळ्यांवर प्रयत्न केले जात आहेत. अपघाताच्या पार्श्वभूमीवर संबंधित वाहनचालकाची ओळख पटवून त्याच्यावर नियमानुसार कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, या भीषण अपघातानंतर बालेवाडी-म्हाळुंग परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. परिसरातील खराब रस्ते, ठिकठिकाणी पडलेले मोठमोठे खड्डे आणि अपुऱ्या सुरक्षा उपाययोजनांमुळे वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः पावसाळ्यात रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे दुचाकीस्वारांसाठी हे खड्डे अधिक धोकादायक ठरत असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

खड्ड्यांमुळे यापूर्वीही या परिसरात किरकोळ तसेच गंभीर स्वरूपाचे अनेक अपघात घडले असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. रस्त्यांची वेळेवर दुरुस्ती न झाल्याने वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन रस्त्यांची तातडीने पाहणी करावी आणि धोकादायक ठिकाणांवरील खड्डे त्वरित बुजवावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

ऋषभच्या अकाली आणि दुर्दैवी मृत्यूमुळे त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एका निष्पाप तरुणाचा जीव गेल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अशा प्रकारच्या दुर्घटना भविष्यात पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. अपघातप्रवण ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करणे, योग्य प्रकाशयोजना उपलब्ध करून देणे, रस्त्यांची नियमित देखभाल करणे आणि गरजेनुसार वाहतूक नियंत्रणाची व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे नागरिकांनी सांगितले.

रस्त्यावरील खड्डे हे केवळ नागरिकांसाठी गैरसोयीचे ठरत नसून, ते थेट वाहनचालकांच्या जीवितासाठी धोकादायक ठरू शकतात, हे या दुर्घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. त्यामुळे प्रशासनाने रस्त्यांच्या दुरुस्तीला प्राधान्य देऊन धोकादायक खड्ड्यांची समस्या कायमस्वरूपी सोडवावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# दगडूशेठ गणपती मंदिराच्या विस्ताराला विरोध..!

## दगडूशेठ गणपती मंदिराच्या विस्ताराला विरोध; फरासखाना ठाणे चर्चेत

**पुणे | प्रतिनिधी**

**पुण्यातील प्रसिद्ध श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराच्या विस्ताराचा मुद्दा सध्या चर्चेत आला आहे. मंदिराचा विस्तार करण्यासाठी मंदिरालगत असलेल्या फरासखाना पोलीस ठाण्याची जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव समोर आला आहे. या प्रस्तावाला पुणे पोलिसांनी तत्त्वतः सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती आहे. मात्र, या निर्णयाला हिंदू महासभेसह काँग्रेसकडून विरोध करण्यात येत आहे.**



दगडूशेठ गणपती मंदिराचा विस्तार करण्यासाठी फरासखाना पोलीस ठाणे दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव आहे. मात्र, हे स्थलांतर तातडीने होणार नसून त्यासाठी पर्यायी जागेची व्यवस्था करावी लागणार आहे.

बुधवार पेठ परिसरात नवीन आणि आधुनिक पोलीस संकुल उभारण्याचा प्रस्ताव आहे. हे संकुल तयार झाल्यानंतर फरासखाना पोलीस ठाण्यासह त्याच्याशी संबंधित कार्यालये आणि युनिट्स तेथे स्थलांतरित करण्याची योजना आहे. त्यानंतर सध्या पोलीस ठाणे असलेली जागा मंदिराच्या विस्तारासाठी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.

या जागेचा मंदिराच्या विस्तारासाठी वापर झाल्यास भाविकांसाठी दर्शन व्यवस्था अधिक सुलभ करता येईल. तसेच मंदिर परिसरातील गर्दीचे नियोजन, भाविकांची ये-जा आणि इतर आवश्यक सुविधांसाठी अधिक जागा उपलब्ध होऊ शकते, असा दावा करण्यात येत आहे.

या प्रस्तावासाठी आमदार हेमंत रासने यांनी पुढाकार घेतल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या मते, फरासखाना पोलीस ठाणे नवीन आणि अधिक सुविधायुक्त ठिकाणी स्थलांतरित करून सध्याची जागा दगडूशेठ गणपती मंदिराच्या विस्तारासाठी वापरता येऊ शकते.

या प्रस्तावाबाबत मुख्यमंत्री कार्यालयाकडून संबंधित विभागाकडून अहवाल मागवण्यात आला होता. त्यानंतर पुणे पोलिसांनी या प्रस्तावाबाबत सकारात्मक अहवाल शासनाकडे पाठवला असल्याची माहिती आहे. मात्र, पोलीस ठाण्याचे स्थलांतर आणि जागा मंदिराला देण्याबाबतचा अंतिम निर्णय राज्य सरकारकडून घेतला जाणार आहे.

मंदिराच्या विस्तारासाठी फरासखाना पोलीस ठाण्याची जागा देण्याच्या प्रस्तावाला हिंदू महासभेचे नेते आनंद दवे यांनी विरोध केला आहे. मंदिराचा विस्तार करताना केवळ सध्याच्या गरजांचा विचार न करता पुढील अनेक वर्षांतील भाविकांची वाढती संख्या आणि परिसरातील नियोजन लक्षात घ्यावे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

दगडूशेठ गणपती मंदिरासाठी दुसऱ्या जागेचा पर्यायही विचारात घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. लाल महाल आणि शनिवारवाडा परिसराचा पर्यायही त्यांनी सुचवला आहे. या भागात मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि पर्यटक येत असल्याने भविष्यातील गर्दी आणि वाहतूक व्यवस्थेचा विचार करून मंदिरासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देता येईल, असा दावा त्यांनी केला आहे.

फरासखाना पोलीस ठाणे स्थलांतरित करण्याची गरज काय, असा सवाल करत आनंद दवे यांनी या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे. गरज पडल्यास या निर्णयाविरोधात न्यायालयात जाण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

फरासखाना पोलीस ठाण्याच्या स्थलांतराच्या प्रस्तावावर काँग्रेसनेही प्रश्न उपस्थित केले आहेत. फरासखाना परिसरात केवळ पोलीस ठाणे नसून पोलिसांशी संबंधित विविध कार्यालये आणि युनिट्स कार्यरत असल्याचे काँग्रेसकडून सांगण्यात आले आहे.

ही सर्व यंत्रणा दुसऱ्या ठिकाणी हलवल्यानंतर त्यांची व्यवस्था कुठे केली जाणार, याबाबत सरकारने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात आली आहे.

फरासखाना परिसरातील रस्ते अरुंद असून, या भागात आधीपासूनच मोठ्या प्रमाणावर वाहतूक आणि नागरिकांची वर्दळ असते. अशा परिस्थितीत पोलीस यंत्रणा हलवल्याने भविष्यात नागरिकांना अडचणी निर्माण होऊ शकतात, असा आक्षेप काँग्रेसने घेतला आहे.

दगडूशेठ गणपती मंदिर हे पुण्यातील प्रमुख धार्मिक आणि पर्यटनस्थळांपैकी एक आहे. गणेशोत्सव तसेच वर्षभर विविध सणांच्या काळात मंदिर परिसरात मोठ्या संख्येने भाविक दाखल होतात. त्यामुळे मंदिराचा विस्तार करताना भाविकांची वाढती संख्या, सुरक्षेची व्यवस्था, वाहतूक नियोजन आणि परिसरातील उपलब्ध जागा यांचा विचार करणे आवश्यक ठरणार आहे.

---

## कृषी विभागाच्या आकृतिबंधावर अधिकाऱ्यांचा आक्षेप; केंद्रित रचनेवर प्रश्न

**पुणे | प्रतिनिधी**

**कृषी विभागाच्या नव्या आकृतिबंधाला महाराष्ट्र राज्य कृषी अधिकारी संघटनेने आक्षेप घेतला आहे. नव्या आकृतिबंधात एकूण २३ हजार ४७६ पदांना मंजुरी देण्यात आली असून, त्यापैकी १९ हजार ७२४ पदे (८४ टक्के) तांत्रिक संवर्गातील, तर ३ हजार ७५२ पदे (१६ टक्के) अतांत्रिक संवर्गातील आहेत. मात्र, हा आकृतिबंध तयार करताना तांत्रिक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या अडचणी आणि शेतकऱ्यांच्या गरजांकडे पुरेसे लक्ष देण्यात आले नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.**




कृषी विभागाचे प्रमुख काम शेती क्षेत्राशी संबंधित तांत्रिक बाबींवर आधारित आहे. त्यामुळे प्रत्यक्ष क्षेत्रीय पातळीवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, नव्या आकृतिबंधात शेतकऱ्यांशी थेट संपर्क ठेवून काम करणाऱ्या तांत्रिक संवर्गातील पदांची रचना बदलण्यात आल्याने कृषी विस्तार यंत्रणा कमकुवत होण्याची शक्यता असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

नवीन आकृतिबंध तयार करताना अतांत्रिक संवर्गातील व्यक्तींच्या माध्यमातून केवळ प्रशासकीय बाबींमध्ये बदल सुचवण्यात आले. मात्र, तांत्रिक संवर्गाच्या प्रत्यक्ष अडचणी, क्षेत्रीय कामकाज आणि शेतकऱ्यांच्या गरजा यांचा पुरेसा विचार झाला नसल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य कृषी अधिकारी संघटनेने केला आहे.

शेतकरी केंद्रित कृषी विस्तार व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेल्या नवीन तांत्रिक संवर्गाची निर्मिती किंवा क्षेत्रीय पातळीवरील मनुष्यबळ वाढविण्याचा विचार मंजूर आकृतिबंधात करण्यात आलेला नसल्याचेही संघटनेने म्हटले आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी अधिकारी संघटनेचे अध्यक्ष हितेंद्र पगार यांनी याबाबत भूमिका स्पष्ट केली. कृषी विभागाचा नवीन आकृतिबंध तयार करताना प्रगतशील शेतकरी, कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ, कृषी अधिकारी संघटना तसेच सेवानिवृत्त कृषी संचालक यांच्यासोबत सविस्तर आणि संयुक्त चर्चा होणे आवश्यक होते. मात्र, अशी व्यापक चर्चा न झाल्यामुळे मंजूर आकृतिबंधाच्या अंमलबजावणीपूर्वी त्याचा पुन्हा अभ्यास करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

पूर्वी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात दोन ते तीन उपकृषी अधिकारी कार्यरत असायचे. आता मंजूर केलेल्या एकूण ६० पदांमध्ये ही संख्या वाढवून २८ पदांपर्यंत नेण्यात आल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे जिल्हा कार्यालयांमध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक जागेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

दुसरीकडे, गावपातळीवर आणि शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी थेट संपर्क साधणाऱ्या कृषी अधिकाऱ्यांची संख्या कमी होत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या मूळ शेतकरी केंद्रित कार्यपद्धतीत बदल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

नव्या आकृतिबंधामध्ये तांत्रिक संवर्गाच्या क्षेत्रीय गरजांचा पुरेसा विचार न करता पदस्थापनेची रचना करण्यात आल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. यामुळे कृषी अधिकारी आणि शेतकरी यांच्यातील थेट संपर्क कमी होऊ शकतो. परिणामी शेतकऱ्यांच्या स्थानिक समस्या समजून घेऊन त्यावर तातडीने मार्गदर्शन करण्यामध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.